# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


No/DSW-50/2015 Date- 03/06/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय :– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्याबाबत.**

**संदर्भ :– शासन परिपत्रक व संकीर्ण १११५/प्र.क्र.१६४/विशि–३ उच्च व तंत्रशिक्षण विभाग दि. : २२/४/२०१५**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, १८ वर्षावरील सर्व मुलामुलींची मतदार म्हणून नोंदणी व्हावी व जास्तीत जास्त मतदारांना उपाय योजना राबवुन मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करावे या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने SVEEP (Systematic Voter Education and Electoral Participation) नावाचा कार्यक्रम राबविला.

त्यानुसार सर्व व्यक्तीनी मतदान करावे यासाठी खालील बाबींची महाविद्यालयाने अंमलबजावणी करावी.

१. महाविद्यालयाने SVEEP कार्यक्रमामध्ये सहभाग घेवून जनजागृती व मतदान प्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करावे.
२. राष्ट्रीय सेवा योजना, सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थी व विद्यार्थीमंडळ या सर्वांनी मिळून शहरी विभाग व ग्रमीण विभागामध्ये लोकांना मतदान प्रक्रियेत सहभागी होईपर्यंत स्वयंसेवकाची भूमिका अधोरेखीत करण्यासाठी प्रयत्न करावा.
३. महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्याकडून संकल्पपत्र/प्रतिज्ञा भरुन संबंधित जिल्हयातील उप निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावे.
४. प्रत्येक महाविद्यालयातील सज्ञान विद्यार्थ्याकडून (१८ वर्षे पूर्ण करणाऱ्या) स्वेच्छेने संकल्पपत्र भरुन संबंधित जिल्हयातील उप निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावे.
५. प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी एका विद्यार्थ्याची **कॅम्पस ॲम्बॅसॅडर** म्हणून तात्काळ नियुक्ती करावे व त्याची माहीती संचालक विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळवावी.
६. निवडणूक आयोगाकडून उपलब्ध साहित्य उदा. घोषवाक्य, बॅनर आणि पत्रके जिल्हयातील उप निवडणूक अधिकारी महाविद्यालयांना उपलब्ध करुन देतील. याकरिता त्यांचेशी संपर्क साधावा.
७. महाविद्यालयांनी प्रतिज्ञा/संकल्पपत्र फलेक्स बॅनरवर लावून त्यावर सहयांची मोहिम राबवावी.

महाविद्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालक विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात सादर करावा.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण

विद्यार्थी कल्याण विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहीतीस्तव:
१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.